महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३५ वा दिनांक : २४/१०/२०२४ वार : गुरूवार

## एकनाथ शिंदेंनी शहांचा सल्ला धुडकावला



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपात भाजपनं अंतर्गत सर्व्हेचा हवाला देत शिवसेनेचे अनेक मतदारसंघ आपल्याकडे घेतले. काही जागांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना उमेदवार बदलायला लावले, तर काही जागांवर विद्यमानांची तिकिटं कापण्यास सांगितली. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरही भाजपच्या केंद्रीय नेतृत्त्वानं शिंदेंना नवे चेहरे देण्याची सूचना केली होती. पण शिंदेसेनेची पहिली यादी पाहता त्यांनी भाजप नेतृत्त्वाच्या सुचनेला हरताळ फासल्याचं दिसत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची काही दिवसांपूर्वी दिल्लीत भेट झाली. त्यावेळी राज्यात आचारसंहिता लागू झालेली नव्हती. राज्यात भाजपविरोधात वातावरण आहे. भाजपनं अधिक जागा लढवल्यास लोकसभेसारखा फटका बसेल. त्याचा परिणाम महायुतीच्या कामगिरीवर होईल. त्यामुळे महायुतीची सत्ता पुन्हा आणायची असल्यास शिवसेनेला १२० जागा लढवू द्या, अशी मागणी शिंदेंनी शहांकडे केली होती. त्यांनी १२० जागांची यादीही शहांना दिली होती.

या भेटीत शहांनी शिंदेंना तिकीट वाटप करताना नवे चेहरे देण्याचा सल्ला दिला. शिवसेनेच्या बहुतांश आमदारांविरोधात नाराजी आहे. त्यामुळे नव्या चेहऱ्यांना संधी द्या. अन्यथा त्या जागांवर पराभव पत्करावा लागेल. त्याचा परिणाम महायुतीच्या एकत्रित कामगिरीवर होईल, असं शहांनी शिंदेंना सांगितलं. शहांचा सल्ला शिंदेंना फारसा रुचलेला नाही, असं त्यावेळी सेनेतील वरिष्ठ नेत्यानं सांगितलेलं होतं.

शहांचा सल्ला ऐकून तिकीट कापल्यास विधानसभेच्या तोंडावर चुकीचा मेसेज जाईल. बंडात साथ देणाऱ्या आमदारांना शिंदेंनी वाऱ्यावर सोडलं, असा संदेश पसरेल. त्याचा फटका बसेल, अशी शक्यता होती. त्यामुळे शिंदेंनी थेट शहांचा सल्ला धुडकावला आणि विद्यमान आमदारांना पुन्हा संधी दिली. भाजपनंही पहिल्या यादीत बहुतांश विद्यमान आमदारांना पुन्हा तिकीट दिलं. आता शिंदेंनी थेट महाशक्तीच्याच पावलावर पाऊल ठेवलं आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपच्या सांगण्यावरुन शिंदेंनी काही ठिकाणी उमेदवार बदलले. काहींची तिकिटं कापली. हिंगोलीत तर जाहीर केलेली उमेदवारी शिंदेंना मागे घ्यावी लागली. भाजपनं सर्व्हेचा हवाला देत या गोष्टी केल्या. पण प्रत्यक्षात भाजपची कामगिरी सुमार झाली. तर शिंदेसेनेची कामगिरी भाजपपेक्षा उत्तम राहिली. त्यामुळे मित्रपक्षाच्या सर्व्हेंना किती किंमत द्यायची, असा प्रश्न शिंदेसेनेतील नेत्यांकडून विचारला जाऊ लागला. लोकसभेत शिंदेसेनेनं १५ जागा लढवत ७ जागांवर बाजी मारली. त्यामुळे शिंदेंचा आत्मविश्वास दुणावला आहे.

## निवडणूक आयोगाचे खर्च निरीक्षक दाखल

### सणासुदीच्या दिवसांत उलाढालींवर ठेवणार करडी नजर




**छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा निवडणूक २०२४ च्या आचारसंहिता कालावधीत दिवाळीसारख्या सणासुदीचा कालावधी येत आहे. त्या पार्श्वभूमीवर शहरात होणाऱ्या आर्थिक उलाढाली व देवाणघेवाण यावर कडक नजर ठेवावी, असे निर्देश जिल्ह्यात दाखल झालेल्या निवडणूक आयोगाच्या खर्च निरीक्षकांनी सर्व संबंधित यंत्रणांना दिले. आज या निरीक्षकांच्या उपस्थितीत सर्व लेखाधिकारी तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय खर्च निरीक्षकांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

नियोजन सभागृहात पार पडलेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, दाखल झालेले खर्च निरीक्षक कोटापट्टी वाम्शी क्रिष्णन व सोभान सुत्रधार यांच्यासह पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपसंचालक तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी शेखर कुलकर्णी तसेच सर्व नोडल अधिकारी व यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

खर्च निरीक्षकांनी सर्व यंत्रणाप्रमुख व नोडल अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. निरीक्षकांनी मार्गदर्शन केले की, दिवाळीसारख्या सणाच्या पार्श्वभुमिवर होत असलेल्या उलाढाली, भेटवस्तू देवाण घेवाण यासारख्या व्यवहारांवर नजर ठेवावी. त्यासाठी बँक खात्यांवर जमा होणाऱ्या व काढली जाणारी रोकड, ऑनलाईन होणारे व्यवहार, झिरो बॅलन्स खात्यांवर अचानक जमा होणाऱ्या रकमा, कपडे, दागिने, भेटवस्तूंच्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या खरेदी अशा बाबींवर लक्ष ठेवावे. तसेच मद्यविक्री, रेल्वे, बस, विमानतळ याठिकाणी तसेच खाजगी वाहनांच्या तपासण्या कराव्या,असे निर्देश देण्यात आले.

राजकीय पक्ष, उमेदवारांकडून दाखवले जाते प्रलोभन

विधानसभा निवडणुकीला सुरूवात झाली आहे. राजकीय पक्ष व उमेदवारांकडून मतदारांना विविध प्रलोभन दाखवले जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे यंदा दिवाळी उत्सवात निवडणूक होत आहे. दिवाळी भेटीच्या नावाखाली मतदारांना गिफ्ट दिले जाण्याची दाट शक्यता असून आदर्श आचार संहितेचा भंग होऊ नये यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी खबरदारी घेत असून त्या अनुषंगाने हि बैठक घेण्यात आली.

## अर्जुनी मोरगावमधून राजकुमार बडोले अजित पवार गटाकडून निवडणूक लढणार — मंगळवारी केला होता पक्ष प्रवेश

**गोंदिया :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात घडामोडींना चांगलाच वेग आलेला दिसत आहे. उमेदवारीसाठी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणाऱ्या नेत्यांची देखील संख्या वाढत आहे. अशातच भाजपचे नेते आणि राज्याचे माजी सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी मंगळवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला आणि बुधवारी बडोले यांना उमेदवारी देखील जाहीर झाली आहे.

बुधवारी अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. या यादीत राजकुमार बडोले यांचे देखील नाव झळकले आहे. गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातून राजकुमार बडोले हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवणार आहेत. राजकुमार बडोले हे भाजप पक्षाकडून दोन वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून लढणारे मनोहर चंद्रिकापुरे यांनी राजकुमार बडोले यांचा अवघ्या ७१८ मतांनी पराभव केला होता.

राज्यात मागच्या काही काळात राजकीय पक्षांमध्ये झालेल्या बदलात आता अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघ महायुतीमधील राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे आला आहे. दरम्यान चंद्रिकापुरे यांनी निवडणूक लढवण्यास नकार दिला असून आपल्या मुलाला उमेदवारी देण्याची मागणी त्यांनी पक्षाकडे केली होती. मात्र पक्षाने यास नकार दिला आहे. यानंतर राजकुमार बडोले यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपल्या ३८ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. अजित पवार हे बारामती विधानसभा मतदारसंघातून एनसीपीचे उमेदवार असणार आहेत. याबरोबरच येवल्यातून छगन भुजबळ तर परळीतून धनंजय मुंडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. राज्यातील विद्यमान मंत्री छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, धर्मराव बाबा आत्राम, आदिती तटकरे, अनिल पाटील, संजय बनसोडे यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे.

## मविआचा ८५-८५-८५ जागांचा फॉर्म्युला

**मुंबई :** महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये एकूण ६५ उमेदवारांचे नाव जाहिर करण्यात आले आहेत.

दहिसर विधानसभा जागेबाबत माजी आमदार विनोद घोसाळकर आणि सून तेजस्विनी अभिषेक घोसाळकर यांच्यात वाद.उद्धव ठाकरेंनी दहिसर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी रोखली आहे.

महाविकास आघाडीच्या ८५-८५-८५ जागांचे वाटप पूर्ण झाले आहे. उर्वरित १८ जागांवर चर्चा करणार आहोत, अशी माहिती संजय राऊत यांनी दिली आहे. महाविकास आघाडीची बैठक झाल्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

आनंद दिघेंच्या पुतण्याची मुख्यमंत्र्यांशी लढत

कोपरी पाचपाखाडी मतदारसंघात उद्धव ठाकरेंनी आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचा सामना थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी होणार आहे.

दरम्यान, समीर भुजबळ हे नांदगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. मात्र महायुतीमध्ये ही जागा शिंदे सेनेला सुटल्यामुळे अजित पवार गटाकडून तिकीट भेटणार नव्हते. त्यामुळे समीर हे ठाकरे गटात प्रवेश करणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. परंतु, आता ठाकरे गटाकडून नांदगावसाठी गणेश धात्रक यांना एबी फॉर्म दिल्यानंतर त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. त्यामुळे समीर भुजबळ यांच्या ठाकरे गटाकडून उमेदवारीच्या आशा मावळल्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २४ ऑक्टोबर २०२४

## माजी खासदार शिवाजी मानेंचा संभाजीराजेंच्या महाराष्ट्र स्वराज्य पक्षात प्रवेश



**हिंगोली :** भाजपाचे माजी खासदार शिवाजी माने यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत बुधवारी तारीख २३ पुणे येथे महाराष्ट्र स्वराज्य पक्षात प्रवेश केला आहे. जिल्ह्यातील बंधाऱ्यांच्या प्रश्नावर विधानसभेत पोहोचण्यासाठी आपण हा पक्ष प्रवेश केल्याचे त्यांनी बोलताना सांगितले.

हिंगोली लोकसभेचे माजी खासदार शिवाजी माने हे शिवसेनेच्या तिकिटावर दोन वेळेस लोकसभेत पोहोचले होते. मात्र त्यानंतर त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला मात्र काँग्रेसमध्ये ते जास्त काळ रमले नाही. त्यानंतर त्यांनी भाजपाला जवळ केले. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांनी हिंगोली जिल्ह्याच्या सिंचनाच्या प्रश्नावर रान उठवले होते. सापळी धरण रद्द करावे यासह इतर मागण्यांसाठी त्यांनी सिंचन संघर्ष समितीच्या माध्यमातून आवाज उठवला होता.

हिंगोली जिल्ह्याची वाहिनी असलेल्या कयाधू नदीवर बंधारे बांधून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी मागील अनेक वर्षापासून लावून धरली होती. यासाठी त्यांनी तत्कालीन राज्यपालांसह राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या गाठीभेटी घेतल्या होत्या. शिवसेना नेते उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी बंधाऱ्याचा प्रश्न मांडला होता त्यावेळी त्यांना बंधाऱ्याचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. मात्र प्रत्यक्षात कुठलाही ठोस निर्णय झाला नाही. सध्याच्या महायुती सरकारच्या काळातही त्यांनी हा प्रश्न मांडला होता मात्र या सरकारनेही त्यांना आश्वासनेच दिली. जिल्ह्यातील सिंचनाच्या प्रश्नावर वेळोवेळी शासनाकडून आश्वासने दिली जात असल्याने माने मागील काही दिवसांपासून नाराज झाले होते. आज पुणे येथे छत्रपती संभाजी राजे यांच्या उपस्थितीत त्यांनी महाराष्ट्र स्वराज्य पक्षात प्रवेश घेतला आहे. यावेळी त्यांचा छत्रपती संभाजी राजे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना माने म्हणाले की, जिल्ह्यातील बंधाऱ्यांच्या प्रश्नावर ठाकरे सरकार तसेच शिंदे सरकारने आश्वासनाशिवाय काहीच दिले नाही. कयाधू नदीचे पाणी ईसापूर धरणामध्ये वळवून नांदेड कडे नेले जात आहे मात्र या प्रश्नावर एकही लोकप्रतिनिधी बोलण्यास तयार नाही त्यामुळेच आपण विधानसभेत जाऊन हा प्रश्न मांडण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे छत्रपती संभाजी राजे यांना राज्यात परिवर्तन करायचे असून त्यांच्या परिवर्तनाला साथ देण्यासाठी तसेच जिल्ह्यातील सिंचनाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण या पक्षात प्रवेश घेतला आहे. या पक्षाच्या माध्यमातून आपण हिंगोली किंवा कळमनुरी विधानसभा निवडणूक लढविणार आहे. स्वराज्य पक्षाच्या माध्यमातून विधानसभेत जाऊन हिंगोली जिल्ह्याचे प्रश्न सोडविणार असल्याचे त्यांनी दिव्य मराठीशी बोलताना स्पष्ट केले

## वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे अजित पवारांच्या भेटीस



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाची विधानसभा निवडणुकीची उमेदवार यादी बुधवारी जाहीर झाली मात्र, सदर यादीत पुण्यातील वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार सुनील टिंगरे यांचे नाव नसल्याने उमेदवारीबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. यादीत नाव न आल्याने टिंगरे हे मुंबईत अजित पवार यांचे भेटीस तातडीने गेले. पोर्श कार अपघात प्रकरणात आरोपींना मदत केल्याच्या आरोपावरून टिंगरे अडकले असून या गुन्ह्यात पोलिसांनी त्यांची चौकशी देखील केली आहे.

भाजपचे माजी शहराध्यक्ष व माजी आमदार जगदीश मुळीक हे देखील वडगावशेरी मतदारसंघातून निवडणुक लढण्यासाठी इच्छुक असून उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. वडगाव शेरी मतदारसंघात खा.शरद पवार यांनी देखील व्यक्तिक लक्ष्य घातले असून टिंगरेंच्या विराधात तगडा उमेदवार देण्याचे ठरवले आहे. नुकतेच माजी आमदार बापू पठारे व त्यांचे पुत्र सुरेंद्र पठारे यांचा भाजपमधून शरदचंद्र पवार गटात प्रवेश झाला आहे. पठारे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. शरद पवार यांनी टिंगरे यांच्यावर जाहीर सभेत सडकून टीका केली असून त्यांना निवडणुकीत दाखवून देऊ, असा इशारा देखील दिला आहे.

दरम्यान, हवेली शिरुर मतदारसंघात देखील अजित पवार गटाने बुधवारी उमेदवार जाहिर केलेला नाही. सदर मतदारंघात उमेदवारीचा पेच कायम आहे. महायुतीत भाजप व अजित पवार गट दोघे या जागेवरुन निवडणुक लढण्यासाठी इच्छुक आहेत. त्यामुळे नेमकी या मतदारसंघात उमेदवारी कोणाला मिळते याची उत्सुकता लागलेली आहे.

## बारामतीमधून अजित पवारांच्या विरोधात युगेंद्र पवार

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीकडून जागावाटपावर चर्चा सुरू असून यातील १८२ उमेदवार जाहीर झाले आहेत. मात्र अजूनही काही जागांवरील तिढा सुटलेला नाही. त्यामुळे अद्याप महाविकास आघाडीची पहिली यादी देखील जाहीर झालेली नाही. यातच अजित पवारांच्या विरोधात बारामतीमध्ये महाविकास आघाडीकडून कोण उमेदवार असणार यावर चर्चा सुरू आहे. यावर शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघात अजित पवार यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून कोण उमेदवार असणार यावर अनेक दिवसांपासून चर्चा सुरू आहेत. यावर शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी स्पष्टीकरण दिले असून ते म्हणाले, युगेंद्र पवार हेच बारामतीमधून अजित पवारांच्या विरोधात उमेदवार असतील असे स्पष्ट सुतोवाच केला आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, बारामती विधानसभा मतदारसंघातून युगेंद्र पवार हेच उमेदवार असतील असे मला वाटते. तसेच संध्याकाळपर्यंत जागावाटपाचा तिढा सुटणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे. दरम्यान अजित पवारांनी मुंब्रा विधानसभा मतदारसंघातून शरद पवार गटाचे उमेदवार जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात नाजीम मुल्ला यांना उमेदवारी दिली आहे. यावर बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, माझ्या विरोधात कोणीतरी उभा राहणारच आहे. पवार साहेब माझे दैवत आहेत, असे देखील जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकारांशी बोलताना म्हणले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## तिकीट न मिळाल्याने भाजपच्या नाराज माजी आ. स्नेहलता कोल्हे यांनी अमित शहांची घेतली भेट



**मुंबई :** कोपरगाव विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या भाजपच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन आपली नाराजी कळवली आहे.

सत्ताधारी महायुतीच्या जागावाटपात कोपरगाव विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला सुटला आहे. पक्षाने येथून आशुतोष काळे यांना उमेदवारी दिली आहे. भाजपच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी आपली नाराजी राज्यातील भाजपच्या नेतृत्वाला कळवली. त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत, त्यांनी मंगळवारी रात्री थेट केंद्रीय मंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची भेट घेऊन आपले म्हणणे मांडले.

फडणवीसांच्या मध्यस्थीने शहांची भेट

यासंबंधीच्या वृत्तानुसार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थीने स्नेहलता कोल्हे यांनी अमित शहांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे सुपुत्र विवेक कोल्हेही उपस्थित होते. या बैठकीत अमित शहा व फडणवीस यांनी कोल्हे कुटुंबीयांना योग्यवेळी योग्य संधी देण्याचा शब्द दिल्याची माहिती आहे. त्यामुळे कोल्हेंनी मतदारसंघात पक्षविरोधी भूमिका न घेता महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. यामुळे देवेंद्र फडणवीस यांना कोपरगाव मतदारसंघातील बंडखोरी रोखण्यात यश आले.

विवेक कोल्हे यांना हवी होती उमेदवारी

उल्लेखनीय बाब म्हणजे माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी कोपरगाव विधानसभा मतदारसंघातून आपले सुपुत्र विवेक कोल्हे यांच्या उमेदवारीसाठी आग्रही होत्या. त्यांनी तशी तयारीही केली होती. पण महायुतीच्या जागावाटपात हा मतदारसंघ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसला सुटला होता. त्यामुळे त्यांची अडचण झाली होती.

विशेषतः राष्ट्रवादीने आपल्या पहिल्याच यादीत येथून विद्यमान आमदार आशुतोष काळे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे कोल्हे कुटुंबीयांकडून बंडखोरी होण्याची शक्यता वाढली होती. पण आता त्यांची संभाव्य बंडखोरी रोखण्यात भाजपला यश आले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २४ ऑक्टोबर २०२४


## पूर्ण याद्या कळाल्यानंतर उमेदवार जाहीर करू, कुणीही फॉर्म भरू नका! - मनोज जरांगे



**जालना :** मराठा आंदोलन मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार देण्याचे ठरवले आहे. त्याअनुषंगाने मनोज जरांगे गुरुवारी आंतरवाली सराटी येथे इच्छुकांशी चर्चा करणार आहेत. यासंदर्भात त्यांनी आज इच्छुक उमेदवारांना काही सूचना केल्या आहेत. कुणीपण फॉर्म भरू नका. आम्ही उद्या फक्त एक उमेदवार देण्याची प्रक्रिया पूर्ण करतोय. त्यांच्या पूर्ण याद्या कळाल्याशिवाय मतदारसंघ आणि उमेदवार सांगणार नाही, असे जरांगे यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे म्हणाले, मी मुलाखती घेणार नाही. इच्छुकांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे मीच त्यांना इकडे बोलावून घेत आहे. आपण सगळं एका टप्प्यात करt. सकाळी ८ वाजेपासून चर्चेला सुरुवात करt. रात्रीचे १२ किंवा पहाटे ४ वाजले तरी सगळ्यांशी चर्चा करणार आहे. उद्या येताना कार्यकर्त्यांना सोबत आणू नका, असे आवाहन मनोज जरांगे यांनी इच्छुकांना केले आहे.

गनिमी काव्याने डाव टाकायचा आपण फक्त उद्या एक उमेदवार देण्याची प्रक्रिया करत आहोत. त्यांच्या पूर्ण याद्या कळाल्याशिवाय मतदारसंघ आणि उमेदवार सांगणार नाही, असे जरांगे म्हणाले. त्यांचे कोण आहेत ते आम्हाला आधी बघायचे आहे. कारण त्यांनी आमच्यावर डाव टाकला होता. आता आम्हाला त्यांच्यावर डाव टाकावा लागणार आहे. त्यामुळे त्यांचे उमेदवार कोण आहेत, हे बघणे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपला उमेदवार आणि मतदारसंघ आताच कळू द्यायचा नाही. गनिमी काव्याने डाव टाकायचा आहे, असे मनोज जरांगे म्हणाले.

उद्याच पूर्ण तोडगा काढण्याचा प्रयत्न मनोज जरांगे म्हणाले, कुणीही अर्ज भरु नका. मी उद्या मतदारसंघ सांगणार नाही. आपण एक-एक उमेदवार तयार करत आहोत. ज्या मतदारसंघात आपण लढायचे ठरवले आहे, त्याच मतदारसंघात लढायचे, बाकीच्यांनी अर्ज काढून घ्यायचे. उद्या राहिलेले सगळे जिल्हे येऊन जा. उद्याच पूर्ण तोडगा काढण्याचा प्रयत्न करणार आहे, असे जरांगे म्हणाले.

घोषणेनंतर ५०० रुपयांचे बाँड घेऊन उमेदवारांची रांग दरम्यान, मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीवरुन महायुतीच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली असून महायुती सरकारचे आमदार पाडण्याचा देखील त्यांनी इशारा दिला होता. तसेच एससी, एसटी मतदारसंघात आपण उमेदवार देणार नाहीत, त्या मतदारसंघातील जो उमेदवार आम्हाला ५०० रुपयांच्या बॉंडवर मराठा आरक्षणासंदर्भात लिहून देईल, त्यांना पाठिंबा देऊ, असेही मनोज जरांगे यांनी म्हटले होते. जरांगेंच्या ५०० रुपयांच्या बाँडच्या घोषणेनंतर त्यांच्याकडे ५०० रुपयांच्या बॉंडवर लिहून देणाऱ्या उमेदवारांच्या संख्येत वाढ झाली. ही संख्या लक्षात घेता, मनोज जरांगे यांनी तुम्ही आमच्याकडे येऊ नका, असे आवाहन केले होते. मराठ्यांचे मतदान आहे, म्हणून तुम्ही उगाच बॉंड लिहीत बसू नका. अगोदर आमच्याशी संपर्क करा किंवा येऊन भेटा, असे मनोज जरांगे म्हणाले होते.

## जयभवानीत नवमतदार जागृती अभियान

### सर्वांनी मतदान करून लोकशाही बळकट करा ! - गटशिक्षणाधिकारी श्री. पिकवणे यांचे प्रतिपादन





**पाटोदा (प्रतिनिधी) :** लोकशाहीत मतदानाचा अधिकार हा सर्वश्रेष्ठ अधिकार आहे. तेव्हा येणाऱ्या निवडणुकीत सर्वांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीला बळकट करावे!असे प्रतिपादन पाटोद्याचे गटशिक्षण अधिकारी मा.श्री.पिकवणे साहेब यांनी केले.

ते जय भवानी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग व गटशिक्षणाधिकारी कार्यालय व महाविद्यालयाचा राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नव मतदार जागृती अभियान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे हे होते. तर व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी मा श्री प्रशांत शिंदे व कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा.सतीश जरांगे व प्रा. डॉ. वंदन जाधव यांची उपस्थिती होती. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. प्रशांत शिंदे यांनी नव मतदाराला मार्गदर्शन करताना लोकशाहीत मतदानाचे महत्त्व पटवून दिले.

अध्यक्षीय समारोप करताना प्रा.सोमनाथ घाडगे यांनी नव मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा!असे नवमतदाराला आव्हान केले. यानंतर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी मतदार जागृती अभियानाच्या घोषणा देत रॅली काढली व त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी नव मतदार विद्यार्थ्यांना मतदान करण्याची शपथ दिली. या कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले व कार्यक्रमाचे आभार राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. बंडू लोखंडे यांनी केले.

हे नवमतदार जागृती अभियान यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम व प्रा.सोमनाथ घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभाग व लोकप्रशासन विभागाने तसेच श्री.कुणाल काळे व श्री. दत्ता चादर यांनी अथक परिश्रम घेतले.

## संभाजी ब्रिगेड स्वबळावर ५० जागा लढणार : प्रदेश प्रवक्ते शिवानंद भानुसे

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासोबतची युती तुटल्यानंतर संभाजी ब्रिगेडने राज्यातील ५० जागांवर स्वबळावर निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने संभाजी ब्रिगेडला विश्वासात घेतले नाही. त्यामुळे आम्ही त्यांच्यासोबतची युती तोडली. आता संभाजी ब्रिगेड राज्यात ५० हून अधिक उमेदवार देऊन स्वबळावर निवडून लढेल, अशी घोषणा संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते डॉ.शिवानंद भानुसे यांनी बुधवारी एका प्रसिद्धी पत्रकारद्वारे केली.

संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष अड. मनोज आखरे, महासचिव सौरभ खेडेकर, गंगाधर बनबरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

संभाजी ब्रिगेडने दोन वर्षापूर्वी शिवसेनेबरोबर युती केली होती. लोकसभा निवडणुकीत एकही जागा न घेता संभाजी ब्रिगेडने शिवसेना (ठाकरे) व महाविकास आघाडीचा प्रचार केला. महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. त्यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानसभेला संभाजी ब्रिगेडला त्यांच्या कोट्यातून किमान चार ते पाच जागा देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु विधानसभेच्या जागा वाटपात आम्हाला सन्मानपूर्वक स्थान व आश्वासनानुसार जागा न दिल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते डॉ. शिवानंद भानुसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.

शिवसेना (ठाकरे) बरोबरची युती तोडून महाविकास आघाडीतून आम्ही बाहेर पडत आहोत. जात, धर्म, फॅसिस्ट शक्तींना संभाजी ब्रिगेडचा नेहमीच विरोध राहिला असून तो कायम राहील. संविधान व लोकशाहीच्या रक्षणासाठी आम्ही लोकांचे प्रश्न, महामानवांचे विचार घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहोत. सुमारे ५० जागांवर आमचे उमेदवार अर्ज भरणार आहेत. महायुतीची सनातन विषमता व आघाडीचे नकली पुरोगामित्व या विरोधात समाजमत तयार करण्याची गरज असल्याचेही डॉ.शिवानंद भानुसे यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## नोकरी विषय : न्यू इंडिया अश्युरन्स कंपनीत ५०० पदांची भरती; ऑनलाईन पद्धतीने करा अर्ज

न्यू इंडिया अश्युरन्स कंपनी लिमिटेड कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात भरतीची घोषणा करण्यात आली आहे. न्यू इंडिया अश्युरन्स कंपनी अंतर्गत सहाय्यक या पदांच्या भरतीसाठी अधिसूचना जारी करण्यात आली आहे. या पदांच्या एकूण जागा भरण्यात येणार आहेत. यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज ऑनलाईन पद्धतीने करायचा आहे. अर्ज २४ ऑक्टोबर २०२४ पासून सुरु होतील. तसेच, अर्ज करण्याची शेवटची तारीख ११ नोव्हेंबर २०२४ आहे.

**पदाचे नाव - या भरती प्रक्रियेमध्ये सहाय्यक या पदाच्या जागांची भरती करण्यात येणार आहे.**

पदसंख्या - देशभरात एकूण ५०० जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. १. उत्तर प्रदेश येथे १६ जागा भरण्यात येणार आहेत. २. बिहार येथे १० जागा भरण्यात येणार आहेत. ३. राजस्थान येथे ३५ जागा भरण्यात येणार आहेत. ४. दिल्ली येथे २८ जागा भरण्यात येणार आहेत. ५. उत्तराखंड येथे १२ जागा भरण्यात येणार आहेत. ६. मध्य प्रदेश येथे १६ जागा भरण्यात येणार आहेत. ७. आंध्र प्रदेश येथे २१ जागा भरण्यात येणार आहेत. ८. अरुणाचल प्रदेश येथे १ जागा भरण्यात येणार आहेत. ९. आसाम येथे २२ जागा भरण्यात येणार आहेत. १०. छत्तीसगड येथे १५ जागा भरण्यात येणार आहेत. ११. गोवा येथे ३ जागा भरण्यात येणार आहेत. १२. गुजरात येथे ३० जागा भरण्यात येणार आहेत. १३. हरियाणा येथे ५ जागा भरण्यात येणार आहेत. १४. हिमाचल प्रदेश येथे ३जागा भरण्यात येणार आहेत. १५. झारखंड येथे १४ जागा भरण्यात येणार आहेत. १६. कर्नाटक येथे ४० जागा भरण्यात येणार आहेत. १७. केरळ येथे ३५ जागा भरण्यात येणार आहेत. १८. महाराष्ट्र येथे ५२ जागा भरण्यात येणार आहेत. १९. मणिपूर येथे १ जागा भरण्यात येणार आहेत. २०. मेघालय येथे २ जागा भरण्यात येणार आहेत. २१. मिझोराम येथे १ जागा भरण्यात येणार आहेत. २२. नागालॅंड येथे १ जागा भरण्यात येणार आहेत. २३. ओरिसा येथे १० जागा भरण्यात येणार आहेत. २४. पंजाब येथे १० जागा भरण्यात येणार आहेत. २५. सिक्कीम येथे १ जागा भरण्यात येणार आहेत. २६. तामिळनाडू येथे ३५ जागा भरण्यात येणार आहेत. २७. तेलंगणा येथे १२ जागा भरण्यात येणार आहेत. २८. त्रिपुरा येथे २ जागा भरण्यात येणार आहेत. २९. पश्चिम बंगाल येथे ५८ जागा भरण्यात येणार आहेत. ३०. अंदमान आणि निकोबार बेटे येथे १ जागा भरण्यात येणार आहेत. ३१. चंदीगड येथे ३ जागा भरण्यात येणार आहेत. ३२. जम्मू आणि काश्मीर येथे २ जागा भरण्यात येणार आहेत. ३३. लडाख येथे १ जागा भरण्यात येणार आहेत. ३४. पॉंडिचेरी येथे २ जागा भरण्यात येणार आहेत.

शैक्षणिक पात्रता - सहाय्यक या पदासाठी कोणत्याही मान्यताप्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून पदवीचे शिक्षण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे.

वेतनश्रेणी - सहाय्यक या पदासाठी पगार सुरुवातीला २२,४०५ रुपये देण्यात येईल. तो पुढे ६२,२६५ रुपयांपरायणात जाईल.

**वयोमर्यादा - २१ ते ३० वर्षे**

अर्ज शुल्क - सामान्य/ ओबीसी/ ईडब्ल्यूएस उमेदवारांसाठी ८५० रुपये अर्ज शुल्क आकारण्यात येईल. तर SC/ST/PH उमेदवारांसाठी १०० रुपये अर्ज शुल्क आकारण्यात येईल.

अर्ज करण्याची पद्धत – ऑनलाईन,

अर्ज सुरू होण्याची तारीख - २४ ऑक्टोबर २०२४, अर्ज करण्याची शेवटची तारीख - ११ नोव्हेंबर २०२४

अधिकृत वेबसाईट – https://www.newindia.co.in/

**अर्ज कसा कराल?** वरील पदासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने करायचा आहे. अर्ज करण्यासाठी https://nationalinsurance.nic.co.in/recruitment या लिंक वर क्लिक करा. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी नोटिफिकेशन काळजीपूर्वक वाचावे. अर्ज शेवटच्या तारखे अगोदर करावा. अर्ज २४ ऑक्टोबर २०२४ पासून सुरु होतील. तसेच, अर्ज करण्याची शेवटची तारीख ११ नोव्हेंबर २०२४ आहे. अधिक माहितीसाठी https://nationalinsurance.nic.co.in/sites/default/files/2024-10/DETAILED%20ADVERTISEMENT-%20RECRUITMENT%20OF%20500%20ASSISTANTS%20%28CLASS-III%29.pdf ही PDF जाहिरात बघावी.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २४ ऑक्टोबर २०२४


# अजित पवारांची ३८ जणांची पहिली यादी जाहिर - नवाब मलिक वेटिंगवर



**मुंबई :** महाराष्ट्रात होऊ घातलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर करण्याची लगबग सध्या सगळ्याच पक्षांमध्ये पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीनंही ३८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आलीय. अजित पवारांनी त्यांच्यासोबतच्या सर्व विद्यमान आमदारांना पुन्हा संधी दिलीय.

बारामती मतदारसंघातून स्वत: अजित पवार पुन्हा एकदा उतरणार आहेत. त्यामुळे बारामतीतून दुसऱ्या कुणाला उतरवलं जाईल, या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे.

सुनील टिंगरे आणि नवाब मलिक वेटिंगवर

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांच्या यादीमध्ये नवाब मलिक आणि सुनील टिंगरे यांची नावे नाहीत.

नवाब मलिक यांचा अणुशक्तीनगर हा मतदारसंघ आहे, तर सुनील टिंगरे वडगाव शेरीचे आमदार आहेत.

मात्र, वडगाव शेरी मतदारसंघातून भाजपचे नेते जगदीश मुळीकदेखील इच्छुक असल्याने त्यांच्या नावाचीही चर्चा जोरदार होती.

याआधी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने १८ उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले होते, त्यामध्ये सुनील टिंगरे यांचाही समावेश आहे. मात्र, आज जाहीर केलेल्या यादीमध्ये त्यांचं नाव समाविष्ट नाही.

दुसरीकडे, काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवाब मलिक यांना महायुतीत घेण्यास विरोध केला होता. त्यांचं नाव आज जाहीर केलेल्या यादीमध्ये नसल्यामुळे त्यांच्या उमेदवारीबाबत अद्यापही साशंकता व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती उपाध्यक्षा आणि प्रदेश प्रवक्त्या सना मलिक - शेख यांनी अणुशक्तीनगर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली होती. मात्र, त्यांचेही नाव या यादीमध्ये समाविष्ट नाही.

अजित पवारांची ३८ उमेदवारांची पहिली यादी

बारामती - अजित पवार, येवला - छगन भुजबळ, आंबेगाव - दिलीप वळसे पाटील, कागल - हसन मुश्रीफ, परळी - धनंजय मुंडे, दिंडोरी - नरहरी झिरवळ, अहेरी - धर्मराव बाबा आत्राम, श्रीवर्धन - आदिती तटकरे, अंमळनेर - अनिल भाईदास पाटील, उदगीर - संजय बनसोडे, अर्जुनी मोरगाव - राजकुमार बडोले, माजलगाव - प्रकाश दादा सोळंके, वाई - मकरंद पाटील, सिन्नर - माणिकराव कोकाटे, खेड-आळंदी - दिलीप मोहिते, अहमदनगर शहर - संग्राम जगताप, इंदापूर - दत्तात्रय भरणे, अहमदपूर - बाबासाहेब पाटील, शहापूर - दौलत दरोडा, पिंपरी - आण्णा बनसोडे, कळवण - नितीन पवार, कोपरगाव - आशुतोष काळे, अकोले - किरण लहामटे, बसमत - चंद्रकांत नवघरे, चिपळूण - शेखर निकम, मावळ - सुनील शेळके, जुन्नर - अतुल बेनके, मोहोळ - यशवंत माने, हडपसर - चेतन तुपे, देवळाली - सरोज आहिरे, चंदगड - राजेश पाटील, इगतपुरी - हिरामण खोसकर, तुमसर - राजू कोरमोरे, पुसद - इंद्रनील नाईक, अमरावती शहर - सुलभा खोडके, नवापूर - भरत गावित, पाथरी - निर्मला विटेकर, मुंब्रा-कळवा - नजीब मुल्ला.

या १८ जणांना अजित पवारांनी वाटले होते एबी फॉर्म —

१) संजय बनसोडे — उद्गीर,
२) चेतन तुपे — हडपसर,
३) सुनील टिंगरे - वडगाव शेरी,
४) दिलीप वळसे पाटील — आंबेगाव,
५) दौलत दरोडा — शहापूर,
६) राजेश पाटील — चंदगड,
७) दत्तात्रय भरणे — इंदापूर,
८) आशुतोष काळे — कोपरगाव,
९) हिरामण खोसकर — इगतपुरी,
१०) नरहरी झिरवळ - दिंडोरी,
११) छगन भुजबळ — येवला,
१२) भरत गावीत — नंदुरबार,
१३) बाबासाहेब पाटील- अहमदपूर,
१४) नितीन पवार — कळवण,
१५) इंद्रनील नाईक- पुसद,
१६) अतुल बेनके — जुन्नर,
१७) बाळासाहेब अजबे- आष्टी,
१८) यशवंत माने — मोहोळ, वाटप करण्यात आलेल्या एबी फॉर्ममध्ये प्रामुख्यानं सुनील टिंगरे, दिलीप वळसे पाटील, दत्तात्रय भरणे, छगन भुजबळ या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्र औराळा येथे जागतिक आयोडीन कमतरता दिन साजरा करण्यात आला



**औराळा (अक्षय चव्हाण) :** प्रा. आ. केंद्र. येथे जागतिक आयोडीन कमतरता दिन, ज्याला ग्लोबल आयोडीन कमतरता विकार प्रतिबंध दिन देखील म्हटले जाते, या निमित्ताने प्राथमिक आरोग्य केंद्र औराळा येथे आशा कार्यकर्त्यांना आयोडीन विषयी वैद्यकीय अधिकारी डॉ प्रतीक्षा राजपूत यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की आपली येणारी पिढी आणि गरोदर मातेने शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी आयोडीन युक्त मिठाचा वापर करावा तसेच पुढे त्यांनी आयोडिन च्या अभावामुळे गलगंड, मूकबधिर,अपंग, मतिमंद यांसारखे आजार होऊ शकतात असेही सांगितले. त्यावेळी ए एन एम श्रीमती संगीता गुंजाळ, श्रीमती बकले, आशा गटप्रवर्तक रेखा वारे, श्री रहाणे, दिपक पवार, व सर्व आशा कार्यकर्त्या हजर होत्या.

## पीएचडी पूर्व परीक्षेत वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थी विद्यापीठातून प्रथम व द्वितीय



लक्ष्मण तौर (प्रथम)



गीता मोरे (प्रथम)



आस्मा शेख (द्वितीय)

**जालना (प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पीएचडी पूर्व परीक्षेत जेईएस महाविद्यालय, जालना येथील वनस्पतिशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त करून कॉलेजचे नाव उंचावले आहे. या परीक्षेत श्री. लक्ष्मण तौर आणि कु. गीता मोरे यांनी ६४ गुणांसह विद्यापीठात प्रथम क्रमांक, तर कु. आस्मा शेख यांनी ६० गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे अथक परिश्रम, मार्गदर्शकांचे मार्गदर्शन आणि विभागातील उत्कृष्ट अध्यापन सुविधा यांचे योगदान आहे. जेईएस महाविद्यालयचे वनस्पतिशास्त्र विभाग हे जिल्ह्यातील एक नावाजलेले संशोधन केंद्र म्हणून ओळखले जाते. या विभागात शिक्षणाबरोबरच संशोधनावरही भर दिला जातो. २०१४ पासून हे विभाग मान्यता प्राप्त संशोधन केंद्र म्हणून कार्यरत आहे. २०१० ते २०१८ या कालावधीत चार लघु UGC संशोधन प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण झाले आहेत. विभागाला १० वेगवेगळ्या संशोधन जर्नल्स/संस्थांचे आजीव सदस्यत्व प्राप्त आहे. २०१० पासून, "बायोसाइन्स डिस्कव्हरी" हे आंतरराष्ट्रीय समीक्षेचे संशोधन जर्नल प्रकाशित केले जात आहे. विभाग विशेषतः वनस्पती रोगशास्त्र, शेती, पिकांवरील रोग व्यवस्थापन, कोशिकीय विज्ञान, आनुवंशिकता आणि जैवविविधता संवर्धन या क्षेत्रात संशोधन केले जाते. विभागात २ संशोधन मार्गदर्शक आणि १४ सहभागी संशोधन मार्गदर्शक कार्यरत आहेत, तर ३२ संशोधनार्थी विविध विषयांवर संशोधन करीत आहेत. विभागाने आतापर्यंत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये १५० संशोधनपत्रे प्रकाशित केली आहेत, जी UGC, Scopus आणि Web of Science मध्ये सूचीबद्ध आहेत. तसेच, २० पेक्षा अधिक संशोधनपत्रे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादर केली आहेत. विभागाने यशस्वीपणे ६ पीएच.डी. पदव्या प्रदान केल्या आहेत. विद्यापीठाच्या पीएचडी पूर्व परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उमेश मोगले, प्राध्यापक डॉ. गणेश कुलकर्णी, श्री. योगेश उरदुखे, प्रगती शिरसाठ आणि सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या भविष्यातील संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या.





